प्रांजल खेवलकरांच्या मोबाईलमध्ये २३४ अश्लील फोटो १९ अश्लील व्हिडीओ- रुपाली चाकणकर



पुणे (प्रतिनिधी)– माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल खेवलकर यांच्या पोलीस चौकशीदरम्यान त्यांच्या मोबाईलमध्ये हिडन फोल्डरला वेगवेगळ्या महिलांचे एकूण एक हजार ७७९ आक्षेपार्ह व्हिडिओ व फोटो आढळून आले आहेत. यामध्ये २३४ फोटो व २५२ व्हिडिओ अधिकच आक्षेपार्ह आहेत. त्यामुळे त्याबाबत अधिक बोलतादेखील येणार नाही. मुलींना ब्लॅकमेल करण्यासाठी संबंधित व्हिडिओचा वापर करण्यात आलेला आहे. तरुणींना मद्य देऊन त्यांच्या नकळत नग्न वा वादग्रस्त फोटो, व्हिडिओ काढून त्यांना ब्लॅकमेल गेल्याचा धक्कादायक प्रकार घडलेला आहे.यामागे मोठे मानवी तस्करीचे रॅकेट असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत विशेष तपास पथक (एसआयटी) नेमून सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली.

पुणे पोलिसांनी खराडी परिसरात छापा टाकून ही रेव्ह पार्टी उघडकीस आणली होती. यावेळी प्रांजल खेवलकर यांच्यासह निखिल पोपटाणे, समीर फकीर मोहम्मद सय्यद, सचिन भोंबे, श्रीपाद मोहन यादव आणि त्यांच्यासोबत असलेल्या दोन महिलांना ताब्यात घेण्यात आले होते. पोलिसांनी त्यांच्याकडून सुमारे ४१ लाख ३५ हजार ४०० ते ४२ लाख ३५ हजार ४०० रुपये किमतीचे कोकेन, गांजा, १० मोबाईल फोन, २ चारचाकी वाहने, हुक्का पॉट आणि दारूच्या बाटल्यांसह इतर अंमली पदार्थ जप्त केले होते. या प्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या विविध कलमांखाली (कलम ८क, २२ब, २१ब, २७, २०(२) सह ७(२), २०(२)) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या छाप्यात दोन दिवसांपूर्वी, म्हणजेच २५ जून २०२५ रोजी, त्याच हॉटेलमध्ये रात्री १० ते पहाटे ४ वाजेपर्यंत दारू आणि हुक्का पार्टी सुरू होती, असेही समोर आले आहे.

पुरवठादारांच्या वाहनांना अडवून खंडणीची मागणी

एमआयडीसीच्या एक्साईड इंडस्ट्रीजमधील प्रकार; दंडवते आणि साथीदारांवर गुन्हा

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – येथील एमआयडीसीतील एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड या बॅटरी उत्पादन करणाऱ्या नामांकित कंपनीत पुरवठादारांकडून येणाऱ्या कच्च्या मालाच्या वाहनांना अडवून, वाहनचालकांना दमदाटी व मारहाणीची धमकी देत आर्थिक खंडणीची मागणी करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी कंपनीचे एचआर प्रमुख निरंजन नंदकुमार कुलकर्णी (वय ३९, रा. एकविरा चौक, सावेडी) यांनी गुरूवारी (७ ऑगस्ट) दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश बबन दंडवते व त्याचे तीन अनोळखी साथीदार यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, गुन्हा दाखल झाला तरीही एमआयडीसी पोलिसांनी त्यांना अद्याप अटक केलेली नाही. कुलकर्णी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुधवारी (६ ऑगस्ट) दुपारी २ वाजेच्या सुमारास, पुणे येथील पुरवठादारांकडून पाठवलेले चार मालवाहू टेम्पो गेट क्र. ३ वर पोहोचले होते. यावेळी आकाश दंडवते आणि त्याचे तीन साथीदार यांनी संबंधित वाहन चालकांना अडवले. त्यांना शिवीगाळ करत दमदाटी केली आणि टेम्पो कंपनीच्या आत नेण्यासाठी रोख पैशांची मागणी केली. यावेळी कंपनीच्या सेक्युरिटी गार्डने हस्तक्षेप केला असता, त्यालाही धमकी देण्यात आली. परिस्थितीच्या गांभीर्यामुळे वाहनांना गेट क्र. १ वरून आत प्रवेश दिला गेला.

गुरूवारी (७ ऑगस्ट) सकाळी सुमारे ८ वाजता, नाशिकहून आलेली मालवाहतूक पीकअप (एमएच १५ जेसी ५२१९) गेट क्र. ३ वर पोहोचली. चालक संतोष विठ्ठल ठाकरे याला आकाश दंडवते व साथीदारांनी अडवून, पैसे न दिल्यास वाहन जाळून टाकू अशी धमकी दिली. त्यामुळे घाबरलेला चालक वाहन परत घेऊन निघाला, आणि संशयित आरोपींनी त्याचा पाठलाग करत असल्याचे निदर्शनास आले. वाहन देहरे (ता. अहिल्यानगर) गावाजवळ मिळून आली आणि ती पुन्हा कंपनीत आणण्यात आली. यावेळी चालकाने पूर्ण हकिकत सांगितली.

दरम्यान, यासंदर्भात एक्साईड इंडस्ट्रीजच्या वतीने खंडणी मागणाऱ्यांविरूध्द पुढे येत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मात्र एमआयडीसी पोलिसांनी आकाश बबन दंडवते आणि त्याच्या तीन पंटर विरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध सुरू आहे.

खंडणीची ई-मेलद्वारे माहिती

- एक्साईड इंडस्ट्रीजच्या पुरवठादार कंपन्या सॅमटेक आणि वेटझन यांच्या वाहनांना अडवून त्यांच्याकडे देखील आकाश दंडवते याने खंडणीची मागणी केली असल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात या कंपन्यांनी एक्साईड इंडस्ट्रीजला ई-मेल करून ही माहिती कळवली आहे, असेही फिर्यादीत नमूद केले आहे. दंडवते याच्याकडून एमआयडीसी परिसरात कंपन्यांवर दहशत करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे लपून राहिलेले नाही.

कृषी विभागाने निलंबीत केले दहा परवाने

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना गुणवत्तापुर्ण कृषी निविष्ठांचा योग्य दरामध्ये पुरवठा होण्याच्यादृष्टीने जिल्ह्यात तालुका स्तरीय गुण नियंत्रण निरीक्षक आणि भरारी पथक यांच्यामार्फत तपासणी मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. या तपासणीत रब्बी हंगामात जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रीत गोंधळ, अनियमिता लिकींग करणे जिल्ह्यातील दहा कृषी केंद्रांना भोवले असून त्यांचे परवाने निलंबित करण्यात आल्याची माहिती कृषी अधिक्षक सुधाकर बोराळे यांनी दिली.

जिल्ह्यात शेतकऱ्यांना गुणवत्ता पूर्ण आणि योग्य दरात कृषी निविष्ठा उपलब्ध व्हावी, यासाठी प्रत्येक तालुका पातळीवर असणाऱ्या गुणनियंत्रण समिती मार्फत विविध उपाय आणि तपासणी मोहिम राबवण्यात येत आहे. या ठिकाणी नियमबाह्य गोष्टी आढळून आल्यास संबंधीतांवर कडक कारवाई करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिलेले आहेत. त्यासोबतच कृषी केंद्रांची तपासणी करुन विविध निविष्ठांचे नमुने काढणे, खत विक्री व्यवहार नोंदी, जादा दराने खते विक्रो, खतांची लिकिंग असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर कृषि निविष्ठा विक्री कायदे व नियम नुसार कारवाई करण्यात येत आहे. त्यानूसार जिल्ह्यात युरीया खताची वाढती मागणी व युरीया विक्रीमध्ये होत असलेल्या गैरप्रकाराच्या तक्रारी कृषी विभागास प्राप्त झालेल्या होत्या, त्या रोखण्यासाठी तसेच

निविष्ठा विक्रीत गोंधळ, अनियमितता, लिकींग भोवले

ई-पॉस वरील खत साठा व गोदामातील प्रत्यक्ष साठा या तफ्रावत आढळुन येत होती. त्यासाठी कृषि विभागाने जिल्हाभरात कृषि सेवा केंद्रांची तपासणी मोहिम व्यापक स्वरुपात राबविण्यात येत आहे. यात कृषि निविष्ठा कायदा, अत्यावश्यक अधिनियम, तसेच परवाने अटी व नियमानुसार त्रुटी आढळलेल्या श्रीगोंदामधील ५, पारनेर तालुक्यातील १ आणि संगमनेर तालुक्यातील ३, अहिल्यानगर तालुक्यातील १ असे जिल्ह्यातील १० कृषि सेवा केंद्राच्या परवान्यांवर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात संबंधितांची सुनावनी घेऊन त्यांचे परवाने निलंबित करण्याचे आदेश बजावले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व कृषि सेवा केंद्र यांना कृषि निविष्ठा कायद्यांतर्गत असलेले नियम व अटी पाळुन शेतकऱ्यांना त्रास होणार नाही, अशा पध्दतीने निविष्ठा पुरवठा करावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी बोराळे यांनी केलेले आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना युरीया ब इतर खतांसोबत लिकिंग अथवा कृषि निविष्ठांच्या गुणवत्ते बाबत तक्रारी असल्यास नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा कृषि विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० वर, तसेच ९८२२४४६६५५ या नंबर वर तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संगमनेरात अल्पवयीन मुलाकडून एकाला विटाने मारहाण

संगमनेर (प्रतिनिधी)– शहरातील परदेशपुरा येथील देशी दारुच्या दुकानासमोर अल्पवयीन मुलाने एका व्यक्तीला अज्ञात कारणावरुन डोक्यात विटाने मारहाण करुन गंभीर दुखापत केल्याची घटना बुधवारी (दि.७) मध्यरात्री घडली. याप्रकरणी शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की परदेशपुरा येथील देशी दारुच्या दुकानासमोर सुहास रामचंद्र वाघमारे (वय ५३, रा. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर, मूळ रा. सांगली) यांना सतरावर्षीय अल्पवयीन तरुणाने अज्ञात कारणावरुन डोक्यात विटा मारुन गंभीर दुखापत केली. जखमीवर सध्या शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. याप्रकरणी पोकॉ. अजित कुऱ्हे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांनी अल्पवयीन तरुणावर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक फराहनाज पटेल या करत आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

पान १ वरुन

निवडणूक आयोगाने भाजपसोबत...

राहुल म्हणाले की, येथील ६.५ लाख मतांपैकी १ लाख मते चोरीला गेली आहेत. काँग्रेसच्या संशोधनातून सुमारे एक लाख चुकीचे पत्ते आणि एकाच पत्त्यावर मोठ्या प्रमाणात मतदार आणि डुप्लिकेट मतदार असल्याचे उघड झाले. कर्नाटकात आपण १६ जागा जिंकल्या असत्या, पण आपण फक्त ९ जागा जिंकल्या. या सात गमावलेल्या जागांपैकी एकाची आम्ही चौकशी केली, ती जागा बेंगळुरू सेंट्रल होती. या जागेवर काँग्रेसला ६,२६,२०८ मते मिळाली. भाजपला ६,५८,९१५ मते मिळाली. दोन्ही पक्षांना मिळालेल्या मतांमध्ये फक्त ३२,७०७ फरक होता. महादेवपुरा विधानसभा जागेवर मतदान झाले तेव्हा दोन्ही पक्षांमधील मतांमध्ये १,१४,०४६ फरक होता. राहुल म्हणाले की, अशा प्रकारे पाहिले तर १ लाखाहून अधिक मते चोरीला गेली. ही मत चोरी पाच प्रकारे झाली.

महाराष्ट्रात ४० लाख बनावट नावे रहस्यमय मतदार कुठून आले?

राहुल म्हणाले की, महाराष्ट्राच्या मतदार यादीतील ४० लाख बनावट नावे रहस्यमय मतदार कुठून आले: महाराष्ट्रात काही महिन्यांत लाखो मतदारांची नावे यादीत जोडण्यात आली, जी खूपच चिंताजनक आहे. ४० लाख मतदार गूढ आहेत. पाच महिन्यांत येथे अनेक मतदार जोडले गेले. निवडणूक आयोगाने मतदार यादीबद्दल उत्तर द्यावे. मतदार यादी बरोबर आहे की चूक हे त्यांनी सांगावे.

संध्याकाळी पाचनंतर मतदान कसे वाढले?

सायंकाळी पाचनंतर मतदानात वाढ होणे हे देखील आश्चर्यकारक आहे. संध्याकाळी पाचनंतर मतदान का वाढले? निवडणूक आयोगाने याचे उत्तर द्यावे. काँग्रेस पक्षाने मतांच्या हेराफेरीबाबत निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले आहेत, परंतु आयोगाने एकही उत्तर दिले नाही. मतांची चोरी पकडण्यासाठी आम्हाला सहा महिने लागले.

हरियाणामधील पराभवासाठी मतदार यादी जबाबदार

या अनियमितता निवडणूक आयोग मतदारांचा डेटा देत नसल्याने आहेत. त्यांनी आरोप केला की यामुळे मते चोरीला जात आहेत. हरियाणामध्ये काँग्रेसच्या पराभवासाठी त्यांनी या अनियमितता जबाबदार धरल्या.

ते इलेक्ट्रॉनिक डेटा का देत नाही

निवडणूक आयोग इलेक्ट्रॉनिक डेटा का देत नाही? आम्ही वारंवार आयोगाकडे डेटा मागितला पण तो आम्हाला देण्यात आला नाही. निवडणूक आयोगानेही आम्हाला उत्तर देण्यास नकार दिला.

बनावट मतदान होत आहे

देशात बनावट मतदान होत आहे. ही चोरी पकडण्यासाठी आम्हाला बराच वेळ लागला. या मतदार यादीत अनेक लोकांच्या वडिलांच्या नावासमोर काहीतरी लिहिले आहे. मतदार यादीतील अनेक घरांचे पत्ते शून्य आहेत. डुप्लिकेट मतदारांची संख्या खूप जास्त आहे. तीन वेळा मतदान केलेले ११ हजार संशयास्पद लोक आहेत. हे लोक कुठून येत आहेत? एकाच पत्त्यावर ४६ मतदार आहेत.

राहुल गांधींच्या डोक्यातली...

गेली आहे. त्यांची हार्डडिस्क करप्ट झाली आहे. म्हणून ते त्याच-त्याच गोष्टी रोज बोलत आहेत. ते खोटं बोलून पळून जात आहेत, अशी बोचरी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

तसेच राहुल गांधी हे रोज वेगवेगळे आकडे देत आहेत. महाराष्ट्रात ७५ लाख मतदार वाढले, असा दावा त्यांनी केला होता. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात १ कोटी मतदार वाढले आहेत, असा दावा करतायत. दरवेळी काहीतरी नवे सांगून ते लक्ष खेचण्याचा प्रयत्न करतात. त्यांची जमीन संपलेली आहे, हे त्यांच्या लक्षात आलं आहे. बिहारमध्येही आम्हाला निवडून येता येणार नाही. महाराष्ट्रातील पुढच्याही निवडणुकीत आमचा विजय होणार नाही, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे अगोदरच ते असा प्रकारची फायरिंग करून ठेवत आहेत, असाही टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

...तर मतदार याद्यांत कशी सुधारण होईल?

बिहारमध्ये निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे सर्वसमावेशक पुनरावलोकन केले जात आहे. याला मात्र राहुल गांधी विरोध करत आहेत. या पुनरावलोकनासाठी मी २०१२ साली याचिका दाखल केली होती. ते मात्र याला विरोध करत आहेत. असं असेल तर मतदार याद्यांत कशी सुधारण होईल? असा सवालही फडणवीस यांनी उपस्थित केला.

सरकारला सळो की पळो...

त्यांनी समजून घेतल्या. बैठकीला ठाकरेंच्या युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, अनिल देसाई, संजय ऊर्फ बंडू जाधव, राजाभाऊ वाजे, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील, संजय देशमुख, ओमराजे निंबाळकर आणि प्रियांका चतुर्वेदी हे उपस्थित होते. ठाकरे गटाच्या आगामी रणनीतीच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

शेतकरी-पशुपालकांच्या हिताशी...

आहे. अमेरिकेने भारतावर ५०% कर लादण्याची घोषणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पंतप्रधान मोदींचे हे विधान आले आहे. खरंतर अमेरिका भारताच्या कृषी आणि दुग्ध क्षेत्रात स्वतःच्या अटींसह प्रवेश करू इच्छिते. अनेक बैठकांच्या फेऱ्यांनंतरही भारत यासाठी तयार नाही. भारतातून अमेरिकेत पाठवल्या जाणाऱ्या वस्तूंवर २५% कर आकारला जाईल. २५% अतिरिक्त कर २७ ऑगस्टपासून लागू होईल. यामुळे अमेरिकन बाजारपेठेत भारतीय वस्तू महाग होतील. त्यांची मागणी कमी होऊ शकते. तेथील आयातदार इतर देशांमधून वस्तू मागवू शकतात.

शेती आणि दुग्ध क्षेत्रामधील फरक, ५ मुद्दे

- अमेरिकेला त्यांचे दुग्धजन्य पदार्थ (जसे की दूध, चीज, तूप इ.) भारतात आयात करण्याची परवानगी हवी आहे. अमेरिकन कंपन्या दावा करतात की त्यांचे दूध स्वच्छ आणि चांगल्या दर्जाचे आहे आणि ते भारतीय बाजारपेठेत स्वस्तदेखील असू शकते.
- भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे आणि लाखो लहान शेतकरी या क्षेत्रात गुंतलेले आहेत. जर अमेरिकन दुग्धजन्य पदार्थ भारतात आले तर स्थानिक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते अशी भीती भारत सरकारला आहे.
- भारतातील बहुतेक लोकांना शुद्ध शाकाहारी दुग्धजन्य पदार्थ हवे असतात, तर अमेरिकेत काही दुग्धजन्य पदार्थ प्राण्यांच्या हाडांपासून बनवलेले एंजाइम (जसे की रेनेट) वापरतात. भारतात अशी अट आहे की ते शाकाहारी असले पाहिजे.
- यासोबतच, अमेरिकेला भारतीय बाजारपेठेत गहू, तांदूळ, सोयाबीन, मका आणि सफरचंद, द्राक्षे इत्यादी फळे कमी करात विकता यावीत अशी इच्छा आहे. भारताने आयात शुल्क कमी करावे अशी त्यांची इच्छा आहे.
- याशिवाय, अमेरिका भारतात जैवतंत्रज्ञान पिके विकण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु भारत सरकार आणि शेतकरी संघटनांचा त्याला तीव्र विरोध आहे.

पंतप्रधान म्हणाले- आम्ही शेतकऱ्यांना आत्मविश्वास दिला. स्वामीनाथन यांनी देशाची अन्न सुरक्षा हे त्यांच्या जीवनाचे ध्येय बनवले.

नगरमधील सव्वा लाख लाडक्या...

लाख महिलांची पडताळणी करण्यात येत असल्याचे महिला बालकल्याण विभागाकडून सांगण्यात आले.

याबाबत महिला बालकल्याण विभागाच्या मुख्य सचिवांकडून नगर जिल्ह्यातील सव्वा लाख महिलांची यादी नगरला पाठवण्यात आली असून आलेल्या यादीनूसार तालुकानिहाय गाव पातळीवर अंगणवाडी सेविका, महसूल विभागाचे कर्मचारी आणि तालुका पातळीवर महिला बालकल्याण अधिकारी यांच्या पातळीवरून या सव्वा लाख महिलांची खाते तपासणी सुरू करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसात ही तपासणी पूर्ण करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यात येणार असल्याचे महिला बालकल्याण विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

अमोल भारती शिर्डीचे...

आहेत. त्यामध्ये नेवासा, संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी बदलले आहेत. अहिल्यानगरचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांची बदली शिडी विभागाच्या उपअधीक्षकपदी करण्यात आली असून शिर्डीचे उपअधीक्षक शिरीष वमने यांची बदली रिक्त असलेल्या अहिल्यानगर ग्रामीणच्या उपअधीक्षकपदी करण्यात आली आहे. श्रीरामपूर विभागाचे उपअधीक्षक बसवराज शिवपुजे यांची बदली मंगलवेढा (जि. सोलापूर) विभागाच्या उपअधीक्षकपदी करण्यात आली असून त्यांच्या जागी अमरावती शहर येथील सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भावर यांची बदली करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश राज्याच्या गृह विभागाने गुरूवारी रात्री उशिरा काढले.

दरम्यान, अधीक्षक घार्गे यांनी जिल्हा पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यामध्ये नेवाशाचे पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांची जिल्हा विशेष शाखेत तर, त्यांच्या जागी नियंत्रण कक्षातून पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची बदली करण्यात आली आहे. सायबर पोलीस ठाण्याचे निरीक्षक मोरेश्वर पेंदाम यांना दहशत विरोधी पथकाचे प्रभारी करण्यात आले असून तेथील निरीक्षक अरविंद जोंधळे यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक देविदास ढुमणे यांची शिर्डी साई मंदिर सुरक्षा विभागात नियुक्ती करण्यात आली असून नियंत्रण कक्षातील प्रवीण साळुंखे यांना संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांसह विविध विभागात कार्यरत असणाऱ्या ९८ पोलीस अंमलदारांच्या देखील बदल्या करण्यात आल्या आहेत. तर, १६ अंमलदारांची सुधारित आदेशानुसार पहिली नियुक्ती रद्द करून दुसरी नियुक्ती देण्यात आली आहे.

चिमकुलीवर शिक्षकाचा अत्याचार

शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलीच्या एकटेपणाचा फायदा घेत शिक्षक फुंदे याने तिच्यावर वेळोवेळी अश्लील वर्तन करत अत्याचार केला. पीडित मुलगी आरडाओरडा करू लागल्यावर त्याने तिला मारहाण केल्याचे समोर आले आहे. ही घटना पीडितेच्या पालकांनी आदिनाथ रामनाथ दराडे, राजेंद्र सूर्यभान दराडे, मुनवरखान सर्वरखान पठाण, उमर नियाज पठाण या चार व्यक्तींना सांगितल्यानंतर त्यांनी तक्रार न करण्यासाठी दबाव आणला. तक्रार केली, तर येथे राहू देणार नाही अशी धमकी दिली. मात्र, प्रकरण बाहेर आल्यानंतर पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या गुन्ह्यात वरील चौघांना पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पुजारी, उपनिरीक्षक विलास जाधव, अंमलदार संदीप ठाकणे, नितीन दराडे, बाबासाहेब बडे, इजाज सय्यद, अक्षय वडते आणि अमोल जवरे यांच्या पथकाने केली.

या घटनेचा पर्दाफाश करण्यासाठी किसन आव्हाड आणि ॲड. हरिहर गर्जे यांनी पुढाकार घेतला. त्यांना सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी, स्नेहालयाचे गिरीश कुलकर्णी तसेच उडान संस्थेच्या पूजा दहातोंडे व शाहीन शेख यांची मोलाची साथ लाभली. पीडित कुटुंबाला मानसिक आधार देत तक्रार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. त्यानंतर पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल केला. दरम्यान, पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी पाथर्डी येथील उपजिल्हा रूग्णालयात करण्यात आली आहे. मुख्य संशयित आरोपी शिक्षक संजय फुंदे सध्या पसार असून त्याच्या अटकेसाठी पथक शोधकार्य करीत आहे. या प्रकरणातील आरोपी शिक्षकाला फाशीची शिक्षा व्हावी व खटला जलदगती न्यायालयात चालवून पीडित कुटुंबाला तात्काळ न्याय मिळावा, अशी मागणी आव्हाड यांनी केली आहे.

हप्ता देत नसल्याने शिर्डीत...

मारुन दुखापत केली व गळ्यातील सोन्याची चेन घेतली. आरोपींनी हॉटेलची तोडफोड करून मोठे नुकसान केले आहे अशी फिर्याद निघोज येथील हॉटेल कल्पदीपचे चालक वैभव दिलीप भाटीया (वय ३७ वर्ष राहणार सावळीवीहीर) याने शिर्डी पोलिसात दिली आहे. पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून या घटनेतील चार आरोपींना ताब्यात घेतले आहे उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे

फिर्यादीत म्हटले आहे की सुमारे एक ते दीड वर्षापासुन मी निघोज शिवारातील नगर मनमाड रोडलगतचे हॉटेल कल्पदिप चालवतो. बुधवार दि ६ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास मी हॉटेलवर असताना हॉटेलमध्ये काही ग्राहक जेवणासाठी बसलेले होते. यावेळी करण आव्हाड, किरण बागुल, रोहीत कापसे, बंटी घाणे, शुभम उर्फ बाळा पवार, शेखर साहेबराव कापसे, विजय बापु कापसे व इतर दोन तीनजण(रा. शिर्डी) असे हॉटेलमध्ये आले व त्यांचे साथीदार अमोल बाणाईत, विकी मिसर हॉटेल बाहेर उभे होते. करण आव्हाड व त्याचे साथीदार मला म्हणाले की, तुला हॉटेल चालवायचे असेल तर आम्हाला महिन्याला दहा हजार रुपये हफ्ता दयावा लागेल. त्यावर मी त्यांना बोललो की, मी तुम्हाला पैसे का देऊ? त्यावरुन या व्यक्तींनी मला लाथाबुक्यांनी मारहाण सुरु केली. तु हफ्ता द्यायला नाही म्हणतो काय, असे म्हणुन हॉटेलमधील खुर्च्यांनी माझ्या डोक्यावर मारले व हफ्त्याचे पैसे दे असे बोलत होते. आव्हाड याने सोड्याची बाटली डोक्यात मारुन दुखापत केली व गेल्या सहा महिन्याचा हॉटेलचा हफ्ता म्हणुन तुझ्या गळ्यातील सोन्याची चैन दे असे म्हणत माझे गळ्यातील चैन काढली. ती झटापटीत खाली पडली. ती किरण बागुल याने उचलून घेतली व खिशात टाकली. बाकीचे लोक खुर्च्यांची टेबलाची झाडांचे कुंड्यांची हॉटेलमधील साहित्याची तोडफोड करुन नुकसान करत होते. त्यावेळी या लोकांचे दहशतीमुळे हॉटेलमधील जेवणासाठी आलेले ग्राहक घाबरुन जागा सोडून सैरावैरा पळाले. माझे डोके फुटुन रक्त येत होते. मी माझ्या रुमालाने डोक्याचे रक्त दाबून धरले होते. तेव्हा माझ्या हॉटेलमध्ये असणारे अर्जुन शमों सागर जावळे वायरमन, वॉचमन अब्दुल सय्यद, मॅनेजर निलेश पवार यांनी मला पकडून धीर दिला व माझा भाऊ वैचंत याला बोलावून घेतले. माझा भाऊ मला उपचारासाठी श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी येथे घेऊन आला असून आता माझ्यावर उपचार सुरु आहे. पोलिसांनी मी शुद्धीवर आल्यानंतर माझा जबाब घेतला आहे. दरम्यान, पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी तपासाची चक्रे जलद गतीने फिरवून सदर गुन्ह्यात विजय बापू कापसे (वय १९ वर्ष बाजार तळ, शिर्डी), किरण अशोक बागुल (वय २३ वर्ष, निघोज तालुका राहाता) बंटी घाणे (वय १९ वर्ष, सौंदडी बाबा चौक, शिर्डी), शेखर साहेबराव कापसे (वय २०, कालिका पार्क, शिर्डी) या ४ आरोपींना ताब्यात घेतले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

शालार्थ घोटाळ्याची २०१२ पासून...

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात नागपूर जिल्ह्यात उघडकीस आलेल्या शालार्थ घोटाळ्याचे तीव्र पडसाद उमटले होते. या घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असल्याची शंका असल्याने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शालार्थ आयडी घोटाळ्याच्या चौकशीसाठी एसआयटी नेमण्याची घोषणा केली होती. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने त्रिसदस्यीय एसआयटी नेमली आहे. या चौकशी समितीत सदस्य म्हणून पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा यांचा समावेश आहे. तर शिक्षण आयुक्तालयाचे सह संचालक हारून आतार हे समितीचे सदस्य सचिव आहेत.

राज्यातील अपात्र शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ प्रणालीत नियमबाह्यरीत्या समाविष्ट करून वेतन अदा करण्यात आल्याचे सर्वप्रथम नागपूर जिल्ह्यात उघडकीस आले. त्यापाठोपाठ नाशिक, जळगाव, बीड, लातूर, मुंबईत गैरप्रकार आढळून आले. या घोटाळ्यात बनावट शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सरकारी वेतन उचलून राज्य सरकारची शेकडो कोटींची लूट केली . याची गंभीर दखल घेत सरकारने घोटाळ्याची पाळेमुळे खणून काढण्यासाठी थेट सन २०१२ पासून आजतागायतपर्यंत शालार्थ घोटाळ्याची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या अंतर्गत अनुदानित आणि अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ मान्यता, सेवासातत्य विनानुदानितवरून अनुदानित पदावर केलेली बदली यांची तपासणी एसआयटीकडून केली जाणार आहे. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या देण्यात येणाऱ्या वैयक्तिक मान्यता, शालार्थ मान्यता यांच्या अनुषंगाने प्रचलित व्यवस्थेत असलेल्या कमतरता शोधून करावयाच्या बदलाबाबत सुधारणा सुचविण्यास समितीला सांगण्यात आले आहे.

स्टेट बँकेत मेगाभरती...

उमेदवार फक्त एकाच राज्यासाठी अर्ज करू शकतात. अर्ज करण्यापूर्वी, तुम्ही ज्या राज्यासाठी अर्ज करत आहात त्या राज्याच्या स्थानिक भाषेचे (वाचन, लेखन, बोलणे आणि समजणे) चांगले ज्ञान असल्याची खात्री करा.

पात्रता

मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा उच्च शिक्षण संस्थेतून कोणत्याही विषयात पदवी. अंतिम वर्षाचे विद्यार्थी देखील अर्ज करू शकतात. परंतु पदवी ३१ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झाली आहे याची खात्री करा.

वयोमर्यादा

२० वर्षे ते २८ वर्षे. उमेदवाराचा जन्म २ एप्रिल १९९७ पूर्वी आणि १ एप्रिल २००५ नंतर झालेला नसावा. वयाची गणना १ एप्रिल २०२५ पासून केली जाईल. अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गाला वयात पाच वर्षे सूट दिली जाईल आणि ओबीसींना तीन वर्षे सूट दिली जाईल.